# साउली सानुली

अंबेला सख्या किती
संख्या कोणा माहिती
अंबेला सख्या किती
साध्या किती खास किती
अंबेला सख्या किती
करी कोण खिजगणती
अंबेला सख्या किती

जरी सख्या खूप असती
परी एक कमी होती
रक्ताची कोणी नव्हती
दिन रातीची संगती

म्हणूनी राधिका प्रकटली
पाहूनी अंबा हरखली
हसूनी सानिकादिदी झाली
सदनी सारी सुखावली
म्हणे अंबा नको बाहूली
राधिका च माझी बाहूली
छोटीशी छकुली सानुली
भगिनी ना दुसरी साउली

अंबा झाली सानिका
तिला भेटली राधिका
दोघी बहिणी जिवाच्या
दोघी मैत्रिणी स्वर्गीच्या

- ताताई
०८/२२/११

(चि. राधिका जन्मदिन श्रावणी सोमवार शुद्ध २, शके १९३३ किंवा ऑगस्ट १, २०११)